मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

दैनिक

# रयत समाचार

epaper.rayatsamachar.com

खिंचो न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे | अंक ५०१ वा ● गुरुवार, ता. २२ जानेवारी २०२६ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

# भारत लवकरच जगातील तिसरी अर्थव्यवस्था- अश्विनी वैष्णव

**डावोस । रयत समाचार**

जागतिक आर्थिक मंचाच्या (WEF) वार्षिक बैठकीदरम्यान केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी भारत येत्या काही वर्षांत निश्चितपणे जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल, असा ठाम विश्वास व्यक्त केला. याच पॅनेल चर्चेत अर्थतज्ज्ञ गीता गोपीनाथ यांनीही भारत तिसरी अर्थव्यवस्था होण्यात शंका नसून २०२८पर्यंत किंवा जीडीपी आकडेवारीच्या फेरआढाव्यानुसार त्याआधीही हे शक्य असल्याचे मत मांडले. डावोस येथे झालेल्या सत्रात बोलताना वैष्णव म्हणाले की, गेल्या दशकात देशात परिवर्तनकारी बदल झाला असून त्यामागे विचारपूर्वक आखलेली, स्पष्ट आणि केंद्रित अंमलबजावणी आहे. हे बदल चार स्तंभांवर आधारित आहेत. यामध्ये भौतिक, डिजिटल व सामाजिक पायाभूत सुविधांमध्ये सार्वजनिक गुंतवणूक, सर्वसमावेशक वाढ, उत्पादन व नवोन्मेष, तसेच प्रक्रियांमध्ये साधेपणा (सिंप्लिफिकेशन) या घटकांचा समावेश असल्याचे त्यांनी सांगितले. ''या सगळ्यांचा एकत्रित परिणाम म्हणून पुढील पाच वर्षांत भारत ६ ते ८ टक्के वास्तविक वाढीसह




२ ते ४ टक्के मध्यम महागाई राखून १० ते १३ टक्क्यांच्या नाममात्र वाढीकडे जाईल,'' असा दावा वैष्णव यांनी केला. तसेच गरीब घटकांच्या सुरक्षेला सरकारने प्राधान्य दिल्याने २५० दशलक्ष लोक दारिद्र्यरेषेवरून बाहेर आल्याचेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, समृद्ध देशांतील प्रचंड जागतिक कर्ज हे भारतासाठी चिंतेचे कारण असल्याचे वैष्णव यांनी सांगितले. जपानमध्ये बाँड्सबाबत निर्माण झालेल्या परिस्थितीचा उल्लेख करत त्यांनी अशा घटना मोठ्या प्रमाणावर घडल्यास त्याचा भारतावर काय परिणाम होईल, याची चिंता व्यक्त केली. गीता गोपीनाथ यांनी सांगितले की, भारत तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होणे ही मोठी अडचण नाही. भारतासमोर खरे आव्हान प्रतिव्यक्ती उत्पन्न वाढवून २०४७पर्यंत विकसित राष्ट्र होण्याच्या उद्दिष्टाकडे वाटचाल करण्याचे आहे. यासाठी सुधारणांचा वेग कायम राखणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. गोपीनाथ यांनी भू-संपादनातील अडचणी उत्पादनक्षेत्राच्या वाढीवर मर्यादा आणत असल्याचे सांगितले. तसेच न्यायव्यवस्थेतील सुधारणा अत्यंत महत्त्वाच्या असल्याचे त्यांनी नमूद केले. कामगार बाजारातील गुंतागुंत आणि रोजगारविषयक नियमांमुळे श्रमाचा वाढीतील वाटा तुलनेने कमी राहतो, असेही त्यांनी सांगितले. कामगार सुधारणा कायदा झाला असला तरी राज्यांनी त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. याच चर्चेत उद्योगपती सुनील भारती मित्तल यांनीही भारत सध्या योग्य दिशेने असून तिसरी अर्थव्यवस्था बनणे निश्चित असल्याचे मत व्यक्त केले. व्यवसाय समुदायाला सक्षम वातावरण, स्थिरता आणि बांधिल सरकारची आवश्यकता असून हे सध्या उपलब्ध असल्याचेही त्यांनी सांगितले. मित्तल यांनी जागतिक पातळीवरील तीव्र स्पर्धा हे भारताच्या वाढीसाठी आव्हान ठरू शकते, असे सांगितले. चीनला अनेक दशकांपर्यंत अमेरिकेसारखा मोठा बाजार लाभला, मात्र भारताला तशी संधी मिळणार नाही. त्यामुळे भारताला स्वतःचे मार्ग शोधावे लागतील, असे त्यांनी स्पष्ट केले. भारताचा देशांतर्गत बाजार मोठा असल्याने हा एक आधार ठरेल, तसेच युरोपियन युनियनसोबत करार लवकर होण्याची आशा त्यांनी व्यक्त केली. प्रदूषण हा भारतासाठी गंभीर प्रश्न असून त्याचा अर्थव्यवस्था व मानवी जीवनावर मोठा परिणाम होत असल्याचे गीता गोपीनाथ यांनी सांगितले. प्रदूषणावर युद्धपातळीवर काम करणे ही देशाची महत्त्वाची मिशन असायला हवी, असेही त्यांनी नमूद केले. अमेरिकेच्या उच्च आयातशुल्कांच्या पार्श्वभूमीवर भारताची वाढ कशी टिकेल, या प्रश्नावर वैष्णव यांनी भारताची अर्थव्यवस्था लवचिक असून मजबूत आर्थिक पाया असल्यामुळे देशाने या अस्थिर कालखंडातही तग धरला असल्याचे सांगितले. उत्पादक नवीन बाजारपेठा शोधत असून उच्च शुल्क असूनही निर्यात वाढल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. भारत मागील दहा वर्षांत जागतिक मूल्यसाखळीत विश्वासार्ह भागीदार म्हणून पुढे आल्याचे त्यांनी नमूद केले.

'धनुष्यबाण' कोणाचा? बाळासाहेब ठाकरे जयंतीदिनी

## शिवसेना पक्ष-चिन्ह वादावर सर्वोच्च न्यायालयाचा निकाल?

**नवी दिल्ली । रयत समाचार**

शिवसेना पक्ष आणि 'धनुष्यबाण' या निवडणूक चिन्हावरून सुरू असलेल्या सत्तासंघर्ष प्रकरणाची सुनावणी सर्वोच्च न्यायालयात मंगळवारी होणार होती. मात्र, वेळेअभावी ही सुनावणी पुढे ढकलण्यात आली असून आता शुक्रवार, २३ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता सरन्यायाधीशांच्या खंडपीठासमोर सुनावणी होणार आहे. शिवसेना पक्ष आणि निवडणूक चिन्ह कोणाचा, याबाबतचा वाद गेल्या तीन वर्षांपासून सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. या प्रकरणाच्या निकालाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले असून, हा निर्णय महाराष्ट्रातील आगामी राजकीय घडामोडींसाठी महत्त्वाचा मानला जात आहे. मंगळवारी सुनावणी न होण्यामागे सरन्यायाधीश सूर्यकांत यांचे दुपारी १ वाजेपर्यंतच नियमित कामकाज असल्याचे कारण सांगण्यात आले. त्यानंतर ते 'अरवली डोंगररांगा' प्रकरणाच्या विशेष सुनावणीत व्यस्त राहणार असल्यामुळे शिवसेना तसेच राष्ट्रवादी काँग्रेसशी संबंधित प्रकरणांना पुरेसा वेळ मिळू शकला नाही. शिवसेना प्रकरण आजच्या कामकाज यादीत ३७ व्या क्रमांकावर असल्याने सुनावणी होणे अशक्य ठरले. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात दोन्ही पक्षकारांना आपली बाजू मांडण्यासाठी तीन-तीन तासांचा वेळ दिला आहे. त्यामुळे येणारी सुनावणी सविस्तर आणि निर्णायक ठरण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे ही सुनावणी शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीदिनी होत असल्याने या दिवसाला भावनिक आणि राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. एकीकडे शिंदे गट तर दुसरीकडे ठाकरे गट अशा दोन्ही बाजूंमध्ये कायदेशीर लढाई अंतिम टप्प्यात पोहोचली असल्याचे चित्र आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून 'तारीख पे तारीख' मिळत असल्याने राजकीय वर्तुळात अस्वस्थता होती. मात्र, शुक्रवारची सुनावणी अंतिम आणि निर्णायक ठरेल, अशी शक्यता व्यक्त केली जात असून, या निकालावर राज्यातील आगामी निवडणुकांचे भवितव्य अवलंबून असणार आहे.

## कॉ. गोविंद पानसरे हत्या प्रकरणातील प्रमुख समीर गायकवाडचा मृत्यू

**सांगली । रयत समाचार**



ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते, शिवाजी कोण होता या जगप्रसिध्द पुस्तकाचे लेखक तथा विचारवंत कॉ. गोविंद पानसरे यांच्या हत्या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी समीर गायकवाडचा मंगळवारी ता.२० रोजी सकाळी सांगली येथे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाला. या घटनेमुळे पानसरे हत्या प्रकरणाला एक वेगळे वळण मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. समीर गायकवाड हा सध्या जामिनावर बाहेर होता तसेच तो सांगली येथील विकास चौक परिसरात वास्तव्यास होता. मध्यरात्री अचानक त्याला अस्वस्थ वाटू लागले, छातीत दुखू लागले. कुटुंबियांनी त्याला तातडीने सांगलीच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारादरम्यान पहाटेच्या सुमारास त्याची प्राणज्योत मालवली. डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले असून, प्राथमिक माहितीनुसार मृत्यूचे कारण हृदयविकार असल्याचे सांगितले जात आहे. समीर गायकवाड हा ब्राह्मणी सनातन संस्थेशी निगडीत आरोपी होता. १६ फेब्रुवारी २०१५ रोजी कोल्हापुरात कॉ. गोविंद पानसरे आणि त्यांच्या पत्नी उमाताई पानसरे यांच्यावर मॉर्निंग वॉकदरम्यान गोळीबार करण्यात आला. या हल्ल्यात जखमी झालेल्या पानसरे यांचे २० फेब्रुवारी २०१५ रोजी उपचारादरम्यान निधन झाले होते. कोल्हापूर पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत १६ सप्टेंबर २०१५ रोजी समीर गायकवाडला सांगलीतून अटक केली होती. तो या प्रकरणातील पहिला अटक झालेला आरोपी होता. सुमारे दोन वर्षे जेलमध्ये राहिल्यानंतर, २०१७ मध्ये पुराव्यांच्या अभावामुळे आणि तांत्रिक बाबींमुळे समीरला सशर्त जामीन मंजूर करण्यात आला होता. त्यानंतर तो सांगलीतच राहत होता. पानसरे हत्या प्रकरणाचा खटला सध्या न्यायालयात सुरू असून, जानेवारी २०२३ मध्ये समीर गायकवाडसह १० जणांवर आरोप निश्चित करण्यात आले होते. खटला अंतिम टप्प्यात पोहोचण्याआधीच मुख्य आरोपीचा मृत्यू झाल्याने या प्रकरणाच्या निकालावर काय परिणाम होईल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. समीरच्या पश्चात त्याचे आई-वडील, भाऊ असा परिवार आहे. त्याच्या मृत्यूची बातमी समजताच सनातन संस्थेच्या वकिलांनी आणि कार्यकर्त्यांनी रुग्णालयात धाव घेतली.

## सोलापूर जिल्ह्याची सूत्रे सुषमा अंधारेंकडे; संपर्कप्रमुखपदी नियुक्ती

**सोलापूर । रयत समाचार**




शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुखांनी संपूर्ण सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख पदाची जबाबदारी सुषमा अंधारे यांच्यावर सोपवली आहे. पक्षाने दाखवलेला हा विश्वास माझ्यासाठी मोठा सन्मान असून तो जपणे हीच माझी प्राथमिक जबाबदारी असेल, अशी प्रतिक्रिया सुषमा अंधारे यांनी दिली. या नव्या जबाबदारीबाबत बोलताना त्या म्हणाल्या, सन्माननीय पक्षप्रमुखांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास हा माझ्यासाठी प्रेरणादायी आहे. निष्ठावंत शिवसैनिकांच्या सहकार्याने संघटन अधिक बळकट करून पक्षाला पुन्हा गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी मी कटिबद्ध राहीन. सोलापूर जिल्ह्यात शिवसेनेची संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यासाठी, कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधत पक्षाची भूमिका तळागाळापर्यंत पोहोचवण्यावर भर दिला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. या नियुक्तीमुळे जिल्ह्यातील शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, आगामी काळात संघटनात्मक कामाला नवे बळ मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## सुनिल तटकरे यांना धक्का; मंत्री गोगावलेंना ध्वजारोहणाचा मान

**रायगड । रयत समाचार**

ता. २६ जानेवारी रोजी देशाचा ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा केला जाणार असून, या दिनानिमित्त कोणत्या जिल्ह्यात कोणत्या मंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार याबाबत शासनाने परिपत्रक जाहीर केले आहे. या यादीमध्ये प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्य शासकीय ध्वजवंदन कार्यक्रमासाठी संबंधित मंत्र्यांची नावे देण्यात आली आहेत.

दरम्यान रायगड आणि नाशिक जिल्ह्यात ध्वजारोहणाच्या मानावरून दरवेळी चर्चा होत असल्याचे चित्र दिसून आले आहे. यावेळी रायगड मुख्यालयातील ध्वजारोहणाचा मान मंत्री भरत गोगावले यांना देण्यात आला असून, नाशिकमध्ये मंत्री गिरीश महाजन हे मुख्य शासकीय ध्वजवंदन कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. रायगडचे पालकमंत्रीपद स्थगित झाल्यापासून अलिबाग येथील मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमावरून शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये रस्सीखेच सुरू होती. गतवर्षी प्रजासत्ताक दिन आणि स्वातंत्र्य दिनी राष्ट्रवादीच्या मंत्री आदिती तटकरे यांना रायगड मुख्यालयातील ध्वजारोहणाचा मान देण्यात आला होता. त्या निर्णयावर नाराजी व्यक्त करत मंत्री भरत गोगावले यांनी वरिष्ठांचा निर्णय मान्य केला होता. यंदा प्रजासत्ताक दिनी कोणाला मान मिळणार याबाबत चर्चा सुरू असताना सामान्य प्रशासन विभागाने परिपत्रक काढून यादी जाहीर केली असून त्यात रायगडच्या ध्वजारोहणाचा मान मंत्री भरत गोगावले यांना देण्यात आला आहे. यामुळे गोगावले समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण असल्याचे सांगण्यात येत आहे. महायुतीतील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये रायगड पालकमंत्रीपदावरून नाराजीनाट्य झाल्याची चर्चा होती. सध्या तरी रायगडच्या पालकमंत्रीपदावर कोणत्याही मंत्र्याची नियुक्ती करण्यात आलेली नाही. मात्र १५ ऑगस्ट २०२५ रोजी पुन्हा मंत्री आदिती तटकरे यांना ध्वजारोहणाचा मान देण्यात आल्याने शिवसेनेच्या आमदारांमध्ये नाराजी व्यक्त करण्यात आली होती. मंत्री भरत गोगावले यांना ध्वजारोहणाचा मान तसेच पालकमंत्रीपद देण्यात यावे, अशी मागणीही झाली होती. या पार्श्वभूमीवर यावेळी रायगडमध्ये मंत्री भरत गोगावले यांना प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहणाचा मान देण्यात आल्याने चर्चा रंगली आहे.

## भाजपाचा ३,३३५ कोटींचा निवडणूक खर्च

### वार्षिक लेखापरीक्षण अहवालातून उघड

**नवी दिल्ली । रयत समाचार**

भाजपचा निवडणूक खर्च दुपटीने वाढला असून, पक्षाने निवडणुकांसाठी ३,३३५ कोटी रुपये खर्च केल्याचे वार्षिक लेखापरीक्षण अहवालातून समोर आले आहे. निवडणूक आयोगाकडे सादर करण्यात आलेल्या अहवालानुसार सत्ताधारी भाजपकडे सुमारे १० हजार कोटी रुपयांची रोख रक्कम व ठेवी असल्याचेही स्पष्ट झाले आहे. अहवालानुसार २०२३-२४ मध्ये भाजपचा निवडणूक खर्च १,७५४ कोटी रुपये होता.

मात्र २०२४-२५ मध्ये हा खर्च वाढून ३,३३५.३६ कोटी रुपये झाला आहे. भाजपच्या रोख रक्कम व ठेवींमध्ये २०२४-२५ या वर्षात २,८८२.३२ कोटी रुपयांची वाढ झाली. संपलेल्या आर्थिक वर्षासाठी ३१ मार्च २०२५ नुसार पक्षाच्या खात्यांत १२,१६४ कोटी रुपये निधी शिल्लक होता. त्याआधी ही शिल्लक ९,१६९ कोटी रुपये होती, असे अहवालात नमूद आहे. सर्वसाधारण निधीत ९,९९६ कोटी रुपये रोख व बँक ठेवींचा समावेश आहे. भाजपला २०२४-२५ या कालावधीत ६,१२५ कोटी रुपयांचे स्वेच्छा योगदान मिळाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. आदल्या वर्षी ही रक्कम ३,९६७ कोटी रुपये होती. तसेच २०२४-२५ मध्ये भाजपला ९,३९० कोटी रुपयांच्या मुदत ठेवींवर व्याजाच्या रूपात ६३४ कोटी रुपये मिळाले आहेत. अहवालानुसार २०२४-२५ मध्ये भाजपने ६५.९२ कोटी रुपये प्राप्तिकर परतावा दाखल केला असून त्यावर ४.४० कोटी रुपये व्याज उत्पन्नही मिळाले आहे. भाजपच्या २०२४-२५ च्या एकूण खर्चापैकी ८८.३६ टक्के खर्च निवडणुकांवर झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. निवडणुकांसाठी ३,३३५.३६ कोटी रुपयांच्या खर्चापैकी उमेदवारांना आर्थिक मदतीच्या स्वरूपात ३१२ कोटी रुपये देण्यात आले, तर विमान व हेलिकॉप्टर प्रवासावर ५८३ कोटी रुपये खर्च झाले आहेत. निवडणूक जाहिरात व प्रचारासाठी इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर १,१२५ कोटी रुपये, होर्डिंग, फलक व कटआउटसाठी १०७ कोटी रुपये, तर छापील साहित्यावर १२३ कोटी रुपये खर्च करण्यात आला आहे. जाहिरातींवर ८९७ कोटी रुपये, प्रचार व सभा मोहिमांवर ९०.९३ कोटी रुपये तसेच बैठकींच्या खर्चावर ५१.७२ कोटी रुपये खर्च झाल्याचे अहवालात म्हटले आहे.

## बाल आनंद मेळाव्यात हजारोंची उलाढाल

### चिमूकल्यांचे खाद्यपदार्थांसह १३० स्टॉल

**पाथर्डी । नितीन गटाणी**

शालेय विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यवहारज्ञानही आत्मसात करता आले पाहिजे. विद्यार्थ्यांना गणिती क्रिया आत्मसात व्हाव्यात तसेच त्यातून तो भविष्यकाळात सक्षम नागरिक बनला पाहिजे, या उद्देशाने मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती जि. प. सदस्या प्रभावती ढाकणे यांनी दिली. शहरातील एकलव्य शिक्षण संस्थेचे एम. एम. निहाळी विद्यालयात बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.



या प्रसंगी ढाकणे बोलत होत्या. मेळाव्यात विद्यार्थी-विद्यार्थिनींनी चविष्ट, चटकदार तसेच आरोग्यदायी खाद्यपदार्थ बनवून आणले होते. मेळाव्याचा विद्यार्थी व पालकांनी आनंद घेतला. स्टॉलधारक विद्यार्थ्यांनी स्टॉलची मांडणी, विविध पदार्थांची खरेदी-विक्री करत गणिती क्रिया प्रत्यक्षात अमलात आणल्याचे पाहून पालकही चकीत झाले. ''आम्ही केलेल्या पदार्थाची चव घ्या,'' असा आग्रह विद्यार्थी करीत होते. मान्यवरांनी पदार्थ चांगला झाला असे सांगितले की विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद स्पष्ट दिसत होता. बुधवारी येथील आठवडे बाजार असल्याने त्यापूर्वीच येथील बाजारात हिरव्या पालभाज्या, भेळ, खेळणी, पाणीपुरी, वडापाव तसेच विविध खाद्यपदार्थांसोबत पेरू, चिकू, बोरे, संत्री, आसाराम मेवा आदी वस्तू विद्यार्थ्यांनी विक्रीसाठी आणल्या होत्या.

इयत्ता पहिली ते दहावीतील विद्यार्थ्यांनी स्टॉल लावले होते. तसेच विद्यार्थ्यांनी शेफची वैशिष्ट्यपूर्ण वेशभूषा धारण केली होती. मेळाव्यात विद्यार्थ्यांनी हजारो रुपयांची उलाढाल केली. मेळाव्याचे उद्घाटन एकलव्य शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष कांतीलाल गुगळे, माजी जिल्हा परिषद सदस्या प्रभावती ढाकणे, गटशिक्षणाधिकारी रामनाथ कराड, विश्वस्त श्रीकांत निहाळी, समन्वयक बाळकृष्ण जोशी, नगरसेवक देवा पवार, नगरसेविका सविता भापकर, सुरेखा हंडाळ, माणिकराव पालवे, संजय दहिफळे, विद्यालयाचे प्राचार्य संजय घिगे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाळासाहेब घुले यांनी केले. सूत्रसंचालन गणेश सरोदे यांनी केले, तर आभार राधाकृष्ण कोठे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संतोष लोहाडे, गणेश कुदळ, विठ्ठल वारकड, गिरीश जोर्वेकर, गणेश खेडकर, राजेंद्र राठोड, रामनाथ चौधरी आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास विद्यालयाचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

फैय्याज अहमद अब्दुल हमीद खान यांची

## महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती

**मुंबई । रयत समाचार**

महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागाने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेत फैय्याज अहमद अब्दुल हमीद खान यांची महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, छत्रपती संभाजीनगर येथे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) पदावर दोन वर्षांच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने नियुक्ती केली आहे.

उम्मीद अधिनियम १९९५ च्या कलम २३ अंतर्गत तसेच शासनाच्या विचाराधीन प्रस्तावानुसार हा आदेश निर्गमित करण्यात आला असून, संबंधित पद सध्या रिक्त असल्याने वक्फ मंडळाच्या कार्यक्षमतेसाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. सध्या सिडको (CIDCO) येथे महाव्यवस्थापक (गृहनिर्माण) म्हणून कार्यरत असलेले श्री. फैय्याज अहमद खान प्रशासकीय अनुभवासाठी ओळखले जातात. त्यांच्या नियुक्तीमुळे वक्फ मालमत्तेचे व्यवस्थापन, विकासकामे, पारदर्शकता आणि प्रशासकीय सुधारणा यांना गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शासन निर्णयानुसार त्यांची सेवा अटी, वेतन, भत्ते व अन्य सुविधा मूळ सेवेनियमांनुसार राहणार असून, लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक असल्यास प्रतिनियुक्ती कालावधी संपण्यापूर्वीही त्यांना परत बोलावण्याचा अधिकार शासनाकडे राहील. या नियुक्तीबाबत अल्पसंख्याक समाजातील विविध स्तरातून समाधान व्यक्त करण्यात येत असून, वक्फ मंडळाच्या कामकाजात सकारात्मक बदल घडेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.






अहिल्यानगर महापालिकेत राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाच्या गटनेतेपदी प्रकाश भागानगरे यांची तर भाजपाच्या गटनेतेपदी शरदा दिगंबर ढवण यांची निवड करण्यात आली.

# निरंकारी मिशनचा ५९ वा वार्षिक संत समागम

## शहरासह जिल्ह्यातून हजारो निरंकारी भक्त उपस्थित राहणार

**अहमदनगर | रयत समाचार**

सद्‌गुरु माता सुदिक्षाजी महाराज व निरंकारी राजपिता रमीत यांच्या दिव्य सानिध्यात निरंकारी मिशनच्या वतीने प्रेम, सेवा आणि एकत्वाच्या पावन भावनांनी ओतप्रोत असलेला महाराष्ट्रातील तीन दिवसीय ५९ वा वार्षिक निरंकारी संत समागमचे भव्य आयोजन सांगली शहरालगतच्या सांगलवाडी येथे ता. २४ ते २६ जानेवारी या कालावधीत होणार असून, संत समागमाला नगर शहरासह जिल्ह्यातून तसेच अहिल्यानगर क्षेत्र अंतर्गत येणाऱ्या शाखा बीड, परभणी, हिंगोली, नांदेड आदी ठिकाणाहून हजारो निरंकारी भक्त उपस्थित राहणार असल्याची माहिती मंडळाचे अहिल्यानगर विभाग प्रमुख हरीश खुबचंदानी यांनी दिली. या आत्मीयतेच्या उत्सवात देश-विदेशातून असंख्य श्रद्धाळू सहभागी होऊन आनंदाचा आणि आध्यात्मिक अनुभवाचा लाभ घेणार आहेत.

दररोज दुपारी २.३० वाजता मुख्य सत्संग कार्यक्रमास प्रारंभ होणार असून, सत्राचा शेवट रात्री ९ वाजता सद्‌गुरु माता सुदीक्षा जी महाराजांच्या आशीर्वचनांनी होणार आहे. यंदाच्या समागमाचा विषय ''आत्ममंथन'' असून तीन दिवस गीत, भजन, कविता, विचार आदींच्या माध्यमातून वक्ते भक्तीच्या अनेक पैलूंवर तसेच आत्मबोध, आत्मशुद्धी आणि मानवी मूल्यांच्या जागृतीवर प्रकाश टाकणार आहेत.



हा समागम केवळ धार्मिक किंवा वार्षिक आयोजन नसून ज्ञान, प्रेम आणि भक्तीचा असा पवित्र संगम आहे, जो ब्रह्मज्ञानाच्या माध्यमातून आत्म्याला परमात्म्याशी जोडतो. येथे श्रद्धाळू आध्यात्मिक जागृतीसमवेत मानवता, विश्वबंधुत्व आणि परस्पर-प्रेम या भावनाही आत्मसात करतात. हे आयोजन 'आत्ममंथना'ची ती दिव्य भूमी आहे, जिथे प्रत्येक साधक आपल्या अंतर्मनात डोकावतो, आत्मचिंतन करतो आणि आपल्या आत्मिक चेतनेला जागृत करण्याची प्रेरणा प्राप्त करतो. सांगलवाडी परिसरात सुमारे ४०० एकरांच्या विस्तीर्ण व भव्य मैदानावर होत असलेल्या समागम स्थळाला भव्य शामियान्यांमुळे दिव्य नगरीचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

विशाल पंडालांमध्ये भक्तांसाठी सुव्यवस्थित बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. या संत समागमासाठी येणाऱ्या लाखो भाविकांच्या सोयीसाठी निवासी तंबू, भव्य लंगर व्यवस्था, कॅन्टीन, डिस्पेन्सरी, सुरक्षा यंत्रणा, नियोजित वाहनतळ आदी अत्यावश्यक सोयीसुविधा करण्यात आल्या आहेत. समागमाच्या मुख्य मंचावर होणारी प्रेरणादायी प्रवचने, भावपूर्ण भजने, कविता आणि विचार अधिक प्रभावीपणे दर्शवण्यासाठी अत्याधुनिक एल.ई.डी. स्क्रीन संपूर्ण परिसरात बसविण्यात आल्या आहेत, ज्यामुळे दूरवर बसलेले श्रद्धाळूही त्याच भाव, ऊर्जा आणि अनुभूतीने सत्संगाचा लाभ घेऊ शकतील. याशिवाय प्रकाशन स्टॉल्स, प्रदर्शनी आदींचीही व्यवस्था असेल.

गतवर्षांच्या परंपरेला पुढे नेत, यंदाही मुंबईच्या श्रद्धाळू भक्तांनी तयार केलेले मुख्य स्वागतद्वार आपल्या कलात्मक भव्यतेसह समागमाच्या आध्यात्मिक रूपरेखेचे प्रतिबिंब म्हणून साकारले आहे. या पवित्र संत समागमात सर्व सज्जनांचे आणि श्रद्धाळू भक्तांचे मनःपूर्वक स्वागत आहे. चला, या आत्मिक मिलन आणि भक्तीच्या महासंगमाचा भाग बनूया, सतगुरुंचे दिव्य दर्शन प्राप्त करूया, त्यांच्या अमृतमय प्रवचनांचा लाभ घेऊया आणि आत्म्याला परमात्म्याशी जोडणाऱ्या या अद्वितीय प्रवासात सहभागी होऊन जीवन धन्य करूया. निःसंशयपणे, हा संत समागम केवळ एक आयोजन नसून आत्ममंथन, आत्मबोध आणि आंतरिक शुद्धी करण्याची सुवर्ण संधी आहे.

# स्मरणशक्ती, आत्मविश्वासवाढीसाठी अबॅकस उपयुक्त- विशाल लाहोटी

## अमेझिंग अबॅकसचा पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात



**अहमदनगर | रयत समाचार**

मानसिक गणना आणि गणितीय समस्या सोडवण्याची क्षमता वाढवण्यासाठी अबॅकस ही पारंपारिक व उपयुक्त पद्धत असून जलद व अचूक गणना तसेच एकाग्रता वाढविण्यासाठी ती सहाय्यक ठरते. या परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांसाठी अमेझिंग अबॅकसने आयोजित केलेला गौरव सोहळा प्रेरक ठरेल, असे प्रतिपादन ट्रेकॅम्पचे संस्थापक व मानसोपचार तज्ज्ञ विशाल लाहोटी यांनी केले. शहरातील अमेझिंग अबॅकस संस्थेने आयोजित सन्मान सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून लाहोटी बोलत होते. यश ग्रँड येथे झालेल्या या कार्यक्रमास फॅशन डिझायनर मेघा लाहोटी, पत्रकार संदीप जाधव, अमेझिंग अबॅकसच्या संचालिका अश्विनी बल्लाळ व संचालक किरण बल्लाळ उपस्थित होते. या पारितोषिक वितरण सोहळ्यात डिस्ट्रीक्ट लेव्हलवर बेसिक मॅथ कॉम्पिटिशन घेण्यात आली. त्यामध्ये १५० विद्यार्थी सहभागी झाले होते. अर्पिता सोनटक्के, स्मिता जाधव आणि सृष्टी धोकरिया यांनी परीक्षण केले. या स्पर्धेत प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ बक्षिसांचे वितरण करण्यात आले. बेसिक मॅथ स्पर्धेमध्ये आज्ञा कुलकर्णी, सानवी अग्रवाल, संतानिका लोंढे आणि अनुष्का दिनकर यांनी विशेष प्राविण्य मिळवले. तसेच सान्वी अग्रवाल, आर्वी शेवाळे, विहान बजाज, सुकन्या चौधरी, मुग्धा विभूती, रिदिमा चिटमील, ओम झोरेकर, प्रथमेश शिंदे, अर्णव शिंदे, आरव माकिजा, मयंक भागवत, पूर्वल खरात, विनायक बोनगीरवार, वेदिका काळबांडे आदी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी किरण बल्लाळ, संदीप जाधव आदींनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी जयश्री कांबळे, कांचन दंडाळे, श्रद्धा देशमुख, डिंपल शर्मा, प्रज्ञा विभूती, इशांत बल्लाळ, दुर्वांक जाधव, सार्थक जगताप, स्वराज कंदलकर आदींनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक अश्विनी बल्लाळ यांनी केले. सूत्रसंचालन जयश्री कांबळे यांनी केले, तर किरण बल्लाळ यांनी आभार मानले.

# जि.प. सीईओ भंडारी यांची मांजरसुंबा गावाला भेट

## विकासकामांची पाहणी; वाचनालयाचे उद्घाटन व वृक्षारोपण

**नगर तालुका | रयत समाचार**

अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी मांजरसुंबा गावाला भेट देऊन मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत सुरू असलेल्या विकासकामांची पाहणी केली. यावेळी त्यांनी कामांबाबत समाधान व्यक्त केले. या भेटीदरम्यान भंडारी यांनी गावातील वाचनालयाचे उद्घाटन केले तसेच वृक्षारोपणही केले. ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना त्यांनी घरपट्टी व पाणीपट्टी वेळेवर भरण्याचे आवाहन केले. तसेच बचत गटांच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण करणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच रूपाली कदम होत्या. यावेळी उपसरपंच जालिंदर कदम, उपमुख्य कार्यकारी राजेंद्र देसले, गटविकास अधिकारी सारंग दुगम, विस्तार अधिकारी रामदास दळवी, विस्तार अधिकारी चंद्रकांत खाडे, सोनल बालवे, ग्रामीण विकास अधिकारी सारिका वाळुंज, कृषी अधिकारी सुविधा वाणी, तलाठी अनिता



जाधव, आरोग्य विभागाचे अशोक इंगळे, डॉ. अनिल कराळे, तंटामुक्ती अध्यक्ष इंद्रभान कदम, मुख्याध्यापक यशवंत भुतकर, प्रवीण भुतकर, ठकाराम कदम, जयश्री मते आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत गावाच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या प्रयत्नांची दखल घेण्यात आली. भंडारी यांच्या मार्गदर्शनामुळे गावातील विकासकामांना अधिक गती मिळेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला.

# प्रभाग १३, १४ मध्ये पाणीपुरवठा विस्कळीत

## नूतन नगरसेवकांकडून आंदोलनाचा इशारा

**अहमदनगर | रयत समाचार**

शहरातील मनपा प्रभाग क्रमांक १३ व १४ मध्ये गेल्या महिन्याभरापासून पाणीपुरवठा विस्कळीत झाल्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. कमी दाबाने व अवेळी पाणी सुटत असल्याने मार्केट यार्ड, माळीवाडा, टिळक रोड, सारसनगर, भवानीनगर, भोसले आखाडा, माणिक नगर, कोठी रस्ता व बुरुडगाव रोड परिसरातील रहिवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या समस्येबाबत नवनिर्वाचित नगरसेवक गणेश भोसले, माजी महापौर भगवान फुलसौंदर, प्रकाश भागानगरे, सुरेश बनसोडे, संजय चोपडा व गोरख पडोळे यांनी महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देऊन तातडीने पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली आहे.

यावेळी नगरसेवकांनी ''येत्या आठ दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास नागरिकांच्या वतीने महापालिकेत तीव्र आंदोलन छेडले जाईल,'' असा इशारा दिला. निवडणुकीच्या काळात नागरिकांकडून पाणीटंचाईबाबत




अनेक तक्रारी करण्यात आल्या होत्या. मात्र निवडणूक झाल्यानंतरही स्थितीत बदल न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढली आहे. दरम्यान आयुक्त यशवंत डांगे यांनी ''काही तांत्रिक कारणांमुळे पाणीपुरवठा विस्कळीत झाला असून तो शक्य तितक्या लवकर सुरळीत करण्यात येईल. यासाठी पाणीपुरवठा विभागाला आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत,'' असे स्पष्ट केले.

# जिल्हा परिषद, पंचायत समितीवर एमआयएमचे लक्ष

## राज्यभर उमेदवार देणार -डॉ. परवेज अशरफी

**अहमदनगर | आबीद खान**

नुकत्याच महाराष्ट्रात झालेल्या नगरपालिका, नगरपरिषद व महानगरपालिका निवडणुकांत एमआयएम पक्षाला चांगले यश मिळाल्याने पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा मनोबल वाढले आहे. नांदेड महानगरपालिकेतून महाराष्ट्रात प्रवेश करणाऱ्या एमआयएमने राज्यातील अनेक नगरपालिका व महानगरपालिकेत दमदार प्रवेश केल्याचे दिसून आले आहे. हैदराबादचा पक्ष म्हणून ओळखला जाणारा एमआयएम आज मुस्लिम समाजासह इतर हिंदू व दलित समाजालाही जोडत असल्याचे चित्र असून निवडणुकांमध्ये मुस्लिम व्यतिरिक्त अन्य समाजातील उमेदवारही पक्षाने उभे केले व निवडून आणल्याचे सांगण्यात आले. यावरून एमआयएम हा केवळ हैदराबादचा पक्ष राहिलेला नसून सर्व समाजातील लोक पक्षाकडे पसंतीने पाहत असल्याचे स्पष्ट होत आहे. महाराष्ट्रात माजी खासदार इम्तियाज जलील यांच्या नेतृत्वाखाली निवडणुका लढवण्यात आल्या. यामध्ये नगरपालिका स्तरावर ८३ नगरसेवक व १ नगराध्यक्ष निवडून आले, तर महानगरपालिकेत १२५ पेक्षा अधिक उमेदवार निवडून आल्याचे सांगण्यात आले. काही महानगरपालिकेत एमआयएम हा दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला असून त्यात औरंगाबाद, मालेगाव व नांदेड महानगरपालिकेचा समावेश आहे. प्रदेशाध्यक्ष माजी खासदार इम्तियाज जलील यांनी आता येऊ घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांकडे मोर्चा वळवला असून राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात समन्वयकांना उमेदवार उभे करण्यासाठी तयारी करण्याचे आदेश देण्यात आल्याचे सांगण्यात आले. नगर महानगरपालिका निवडणुकीत पहिल्यांदाच एमआयएमने जिल्हाध्यक्ष डॉ. परवेज अशरफी यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवली असून पक्षाचे २ नगरसेवक निवडून आले. तर २ उमेदवारांचा अत्यल्प मताने पराभव झाला. नगर महापालिका निवडणुकीतील कामगिरीत एमआयएमने शिवसेना (उद्धव ठाकरे), राष्ट्रवादी (शरद पवार), मनसे व वंचितपेक्षा चांगली कामगिरी केल्याचा दावा डॉ. अशरफी यांनी केला. आता जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये पक्ष आपले नशीब आजमावणार असून राज्य व जिल्ह्यातील अनेक ठिकाणी उमेदवार देण्यात येणार असल्याचे डॉ. परवेज अशरफी यांनी सांगितले. तसेच महाराष्ट्रासह देशात एमआयएमला वाढती पसंती मिळत असल्याने धर्मनिरपेक्ष पक्षांनी आपली भूमिका स्पष्ट करणे गरजेचे असल्याचेही त्यांनी नमूद केले.



# 'सत्यमेव जयते'चा सन्मान राखला; सजग शिक्षकाच्या पाठपुराव्याने राजमुद्रेतील त्रुटी दुरुस्त

**अहमदनगर | रयत समाचार**

राष्ट्रीय प्रतीकांचा सन्मान अबाधित राहावा यासाठी सनदशीर मार्गाने सातत्याने लढा देणारे अहिल्यानगर येथील शिक्षक शेख शहाजान फकीर यांचा आणखी एक प्रयत्न यशस्वी ठरला आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याखाली बसविण्यात आलेल्या राजमुद्रेवर राष्ट्रीय घोषवाक्य ''सत्यमेव जयते'' नसल्याची गंभीर त्रुटी त्यांच्या निदर्शनास आली होती. त्यांच्या पाठपुराव्यानंतर प्रशासनाने ही चूक मान्य करून अखेर दुरुस्ती केली आहे. अहिल्यानगरमध्ये २७ जुलै २०२५ रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण झाले होते. त्या वेळी पुतळ्याखालील राजमुद्रा अपूर्ण असून, तिच्या खाली ''सत्यमेव जयते''






हे शब्द नसल्याचे शेख शहाजान फकीर यांच्या लक्षात आले. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, हातात घटनेची प्रत घेतलेला पुतळा आणि त्याखाली अपूर्ण राजमुद्रा हा विरोधाभास त्यांनी तात्काळ प्रशासनाच्या निदर्शनास आणला. शेख यांनी महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांना ई-मेलद्वारे लेखी तक्रार केली. आयुक्तांनी संबंधित यंत्रणांकडून मार्गदर्शन मागवून आवश्यक कार्यवाही केली. अखेर ही त्रुटी दुरुस्त करण्यात आली असून, प्रशासनाने पत्राद्वारे शेख यांना त्यांच्या सूचनेची दखल घेतल्याची माहिती दिली आहे. मूळ राजमुद्रेत ''सत्यमेव जयते'' हे घोषवाक्य अविभाज्य घटक असताना अनेक ठिकाणी ते शब्द गाळले जातात, हा प्रश्न शेख यांनी यापूर्वीही सातत्याने उपस्थित केला आहे. यावेळी उशिरा का होईना, पण महापालिका प्रशासनाने चूक सुधारून नागरिकाला कळविले, हे निश्चितच समाधानकारक आणि स्वागतार्ह आहे. राष्ट्रीय प्रतीकांचा सन्मान जपण्यासाठी सजग नागरिकांची भूमिका किती महत्त्वाची आहे, याचे हे उत्तम उदाहरण ठरले आहे.

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com **(वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)**

# ग्रामपंचायतीच्या मनमानी विरोधात अमोलीक यांचे उपोषण सुरू



**बेलापूर । शफीक बागवान**

बेलापूर बुद्रुक ग्रामपंचायत ने अकराशे घरकुलाचे बांधकाम सुरू केले असून घरकुलाची जागा कुणाचेही नावावर नसताना चुकीच्या पद्धतीने बांधकाम सुरू केले, या निषेधार्थ मंगळवार, ता. २१ जानेवारी पासून ग्रामपंचायत सदस्य रमेश अमोलीक हे ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसले आहेत. बेलापूर ग्रामपंचायत घरकुल रेखांकन व जागावाटप याबाबत गांभीर्याने घेणे टाळत आहेत. घरकुल बांधकाम सुरू करताना ग्रामपंचायतीने गाजावाजा केला. घरकुल कॉलनी बांधकाम कोणाच्या आदेशाने काम चालू केले. ग्रामपंचायतच्या ३१ डिसेंबर रोजी झालेल्या मासीक बैठकीत सदस्य भरत साळुंके व रमेश अमोलीक यांनी लेआउट बाबत विषय मांडला. ज्या अभियंतेकडून ले आऊट केले आहे तो अभियंता व गावातील विविध अभियंते जे विषयात तज्ञ आहेत आणि त्यात काम करत आहेत तसेच नगररचना विभागातील अधिकारी यांची एकत्रित बैठक घ्यावयाचे ठरले होते. परंतु तसे केले नाही. ज्या लोकांना कॉलनीत घर बांधण्याची ऐपत नाही अशा लोकांना ५०० चौरस फूट जागा वाटून देण्याचे ठरलेले असतानाही जागा वाटप करून न देता घरकुल कॉलनीचे काम जोरात सुरू केलेले आहे. हे करत असताना सर्व नियम धाब्यावर बसवलेले आहे. घरकुल वाटप करताना चिठ्ठ्या टाकून घरकुल वाटप केले पाहिजे होते . परंतु यातही वशिलेबाजी होताना दिसत असल्याचा आरोप अमोलीक यांनी केला आहे. आपला स्वार्थ साधना करता सुमारे अकराशे घरकुल कुणाचे नावावर जागा नसतानाही त्या जागेवर घरकुलाचे बांधकाम सुरू केलेले आहे याबाबत वारंवार निवेदन देऊनही काहीही उपयोग झाला नाही त्यामुळे चुकीच्या पद्धतीने सुरू असलेले घरकुलाचे काम थांबून अगोदर घरकुलाची जागा वाटप करून मगच बांधकाम केले जावे, या मागणी करता आपण आमरण उपोषणास सुरुवात केली असल्याचे आमोरीत म्हणाले असल्याचे आमोलीक म्हणाले.



# ‘एसआयआर’ अचूकतेसाठी प्रशासन ॲक्शन मोडवर

## बीएलओंचे प्रशिक्षण संपन्न, प्रांताधिकारी सावंत यांचे मार्गदर्शन

**श्रीरामपूर । संदीप पाळंदे**

मतदार यादी अद्ययावत करून त्यातील त्रुटी दूर करण्यासाठी प्रशासन ॲक्शन मोडवर आले आहे. २२० श्रीरामपूर (अ.जा.) विधानसभा मतदारसंघांतर्गत येणाऱ्या सर्व बी.एल.ओ. यांची प्रशिक्षण व आढावा बैठक मंगळवारी (दि. २०) तहसील कार्यालयातील सभागृहात संपन्न झाली.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी प्रांताधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी किरण सावंत-पाटील होते. यावेळी आगामी ‘एस.आय.आर.’ मोहिमेच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यात आला. मतदार यादीतील मतदारांची प्रत्यक्ष पडताळणी करणे, डी.एस.ई. आणि पी.एस.ई. डेटा दुरुस्त करणे तसेच मयत, दुबार आणि कायमस्वरूपी स्थलांतरित मतदारांची नावे वगळण्याचे काम पारदर्शकपणे करण्याच्या सूचना देण्यात आल्या. प्रांताधिकारी किरण सावंत-पाटील व प्रशिक्षक सचिन गायकवाड यांनी बी.एल.ओ.ना तांत्रिक कामाचे सखोल प्रशिक्षण दिले.

तसेच बी.एल.ओ. नी विचारलेल्या शंका व प्रश्नांचे समाधानकारक निरसन करण्यात आले. यावेळी श्रीरामपूर नगरपरिषदेचे उपमुख्य अधिकारी महेंद्र तापकीर, निवडणूक नायब तहसीलदार हेमलता वाकडे, महसूल सहायक ओम खुपसे, स्विप नोडल अधिकारी गणेश पिंगळे, निवडणूक समन्वयक संदीप पाळंदे यांसह मतदारसंघातील बी.एल.ओ. मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठक यशस्वी करण्यासाठी महसूल सेवक अभिजीत कोळसे, कैलास हांडे, इम्रान शेख, श्रद्धा तापोळे, तृप्ती झेंडे, अक्षय बागडे, पवन झिंगारे यांनी मेहनत घेतली.



# मंत्री आठवले यांनी घेतली श्रीकांत भालेराव यांची भेट

**संगमनेर । नितीनचंद्र भालेराव**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे प्रदेश उपाध्यक्ष पँथर श्रीकांत भालेराव यांना हृदयविकाराचा झटका आल्याने मुंबई येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांच्यावर तातडीने औषधोपचार करण्यात आले.

केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी रुग्णालयात जाऊन श्रीकांत भालेराव यांची भेट घेत धीर दिला. तसेच उपचार करणाऱ्या डॉक्टरांशी चर्चा करून त्यांच्या प्रकृतीची माहिती घेतली. दरम्यान त्यांना काल सायंकाळी रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. यावेळी आठवले म्हणाले की, पँथर श्रीकांत भालेराव हे माझे जुने सहकारी व आंबेडकरी चळवळीतील झुंजार नेतृत्व असून त्यांच्या प्रकृतीत आता हळूहळू सुधारणा होत आहे. डॉक्टरांनी त्यांना सक्तीच्या विश्रांतीचा सल्ला दिला असून ते लवकरच पूर्णपणे बरे होऊन पुन्हा जनसेवेसाठी सक्रिय होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. श्रीकांत भालेराव यांच्या प्रकृतीत सुधारणा होत असून त्यांना काल सायंकाळी डिस्चार्ज देण्यात आला आहे. फुले, शाहू, आंबेडकर चळवळीतील कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी काळजी करू नये, अशी माहिती त्यांचे सुपुत्र मंगेश भालेराव यांनी दिली.

# कविता केवळ शब्दांचा खेळ नसून ती समाजभान जपणारी अभिव्यक्ती– प्रा. राशिनकर



**नेवासा । रयत समाचार**

मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा ता.. १४ ते २८ जानेवारी २०२६ निमित्त मुळा एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, माका येथे प्राचार्य डॉ. भानुदास चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली कविता वाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी प्रसिद्ध कवी, कुसुमाग्रज गौरव पुरस्काराने सन्मानित काव्यरत्न प्रा. रावसाहेब भिकाजी राशिनकर हे प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित होते. प्रा. राशिनकर यांनी विद्यार्थ्यांना कविता वाचनाची शैली, भावाभिव्यक्तीचे महत्त्व तसेच काव्यलेखनातील अनुभव सांगत मार्गदर्शन केले. कविता केवळ शब्दांचा खेळ नसून ती समाजभान जपणारी अभिव्यक्ती असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने आणि भावनेतून कविता सादर करावी, असा सल्लाही त्यांनी दिला. कविता वाचन स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विविध विषयांवरील कविता सादर होत असताना उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात प्रतिसाद दिला. प्रा. राशिनकर यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना काव्यकलेची नवी दिशा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. साहित्यप्रेम वाढवणारी ही स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दत्ता कोकाटे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. अमोल दहातोंडे यांनी करून दिला, तर आभार प्रदर्शन प्रा. अमोल दरंदले यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गदेवाडीत त्रिदिनी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

गदेवाडी येथे श्री विठ्ठलरुक्मिणी मूर्ती व वै. गुरुवर्य हभप महंत भिमसिंह महाराज यांच्या मंदिराच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त त्रिदिनी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून हा सप्ताह ता. २३ पासून भक्तिमय वातावरणात उत्साहात सुरू होणार आहे. या सप्ताहास हभप भारस्कगिरी महाराज देवगड संस्थान व हभप महादेवदानंद भारती महाराज अश्वलिंग संस्थान (पिंपळवंडी) यांचे कृपाशीर्वाद लाभले असून, हभप दिलीप महाराज गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हरिनाम सप्ताहात दररोज पहाटे काकडा भजन, श्री विष्णुसहस्रनाम, गाथा भजन, सायंकाळी हरिपाठ, तसेच रात्री नामवंत कीर्तनकारांची कीर्तने व हरिजागर असे विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. या सप्ताहात हभप रामगिरी महाराज, हभप श्रीराम महाराज शेळके यांची कीर्तने होणार असून, रविवारी मूर्ती प्राणप्रतिष्ठा व वर्धापन दिनानिमित्त हभप महंत देविदास महाराज म्हस्के (ज्ञानेश्वर महाराज संस्थान, नेवासा) यांचे अमृततुल्य कीर्तन होणार आहे. कार्यक्रमानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात येणार असून, या धार्मिक सोहळ्यास ग्रामस्थ, भजनी मंडळी व भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# डॉ. कर्डिले यांची ‘कॅप्टन’ पदावर निवड



**नेवासा । रयत समाचार**

नेवासा तालुक्यातील गेवराई येथील प्राध्यापक ज्ञानदेव कर्डिले यांचे चिरंजीव डॉ. धनंजय कर्डिले यांची भारतीय सैन्य दलामध्ये ‘‘कॅप्टन’’ पदावर नुकतीच निवड झाली आहे. इंडियन आर्मी मेडिकल कॉर्प्स तर्फे झालेल्या निवड चाचणीत खडतर चाचण्या उत्तीर्ण करत त्यांनी हे यश संपादन केले आहे. डॉ. धनंजय यांचे प्राथमिक शिक्षण पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील नवोदय विद्यालयात झाले. त्यानंतर नगर तालुक्यातील विळद येथील डॉ. विखे पाटील कॉलेजमधून त्यांनी एमबीबीएस पूर्ण केले. त्यांचे वडील प्रा. ज्ञानदेव कर्डिले आणि आई सविता कर्डिले हे शेवगाव येथील आदर्श विद्यालयात शिक्षक आहेत. शनिशिंगणापूर देवस्थानचे माजी विश्वस्त डॉ. वैभव शेटे यांचे ते मावसभाऊ, तसेच प्रसिद्ध निवेदक एस.बी. शेटे यांचे भाचे असून सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे. आमदार विठ्ठल लंघे, आदर्श विद्यालयाच्या अध्यक्ष जयश्री गडाख, सचिव रविराज गडाख, देवस्थानचे माजी विश्वस्त व मुळा कारखान्याचे संचालक बापू शेटे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. डॉ. धनंजय कर्डिले हे संरक्षण खात्यातील नवतंत्रज्ञान अवगत करण्यासाठी तेलंगणा राज्यातील सिकंदराबाद येथे पुढील प्रशिक्षणासाठी रवाना झाले आहेत.

# पोलीस बंदोबस्तात विषय समित्या गठीत; मराठा समाज सत्तेपासून वंचित

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

शेवगाव नगरपरिषदेच्या विविध विषय समित्यांच्या निवडी आज तहसील कार्यालयात पार पडल्या. निवडीदरम्यान नगरसेवकांमध्ये मतभेद, आरोप-प्रत्यारोप आणि राजकीय तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. समिती रचनेवरून असलेली उत्सुकता व अंतर्गत नाराजी पाहता परिस्थिती संवेदनशील बनली होती. प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून कडक पोलीस बंदोबस्त ठेवला. बंदोबस्त नसता तर निवडीदरम्यान एखादा अनुचित प्रकार घडू शकला असता, अशी चर्चा घटनास्थळी उपस्थितांमध्ये होती. शेवगाव नगरपरिषदेत एकूण २४ नगरसेवक व एक अध्यक्ष असून समिती निवडीच्या वेळी सर्व २४ नगरसेवकांची उपस्थिती होती. कोणताही नगरसेवक अनुपस्थित नसल्याने निवड प्रक्रिया पूर्ण उपस्थितीत पार पडली. नगरपरिषदेच्या एकूण सहा विषय समित्या गठीत करण्यात आल्या असून प्रत्येक समितीत पाच सदस्यांचा समावेश करण्यात आला आहे. शहराच्या विकासाशी थेट निगडीत असलेल्या सार्वजनिक बांधकाम, नियोजन व विकास,



स्वच्छता व सार्वजनिक आरोग्य, पाणीपुरवठा व जलनिसारण तसेच महिला व बालकल्याण समित्यांच्या सभापतीपदाच्या निवडी जाहीर करण्यात आल्या. सार्वजनिक बांधकाम समितीच्या सभापतीपदी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) चे कैलास भाऊराव तिजोरे, नियोजन व विकास समितीच्या सभापतीपदी नॅशनल काँग्रेस पार्टीचे शिराजुद्दीन बाबूजी पटेल यांची सर्वानुमते निवड झाली.

स्वच्छता, वैद्यक व सार्वजनिक आरोग्य समितीच्या सभापतीपदी भारतीय जनता पार्टीच्या दीप्ती कमलेश गांधी, पाणीपुरवठा व जलनिसारण समितीच्या सभापतीपदी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) चे रिजवान छोटूभाई शेख, तर महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी नॅशनल काँग्रेस पार्टीच्या शेख परवीन अमर यांची निवड करण्यात आली.

या समिती वाटपातून सत्तेतील विविध पक्ष व गटांमध्ये समन्वय साधण्यात आल्याचे चित्र दिसून येत आहे. निवडणूक काळात परस्परविरोधी भूमिका घेणारे पक्ष समिती वाटपात एकत्र आल्याने नागरिकांमध्ये चर्चांना उधाण आले आहे. राजकीय मतभेद बाजूला ठेवून विकासासाठी काम होणार की अंतर्गत संघर्ष पुढे येणार, याबाबत संभ्रमाचे वातावरण आहे. सर्व समिती निवडी तहसील कार्यालयातील बंद खोलीत पार पडल्या. नगरसेवक वगळता इतर कोणालाही प्रवेश देण्यात आला नव्हता.

या निवड प्रक्रियेवर पीठासीन तथा अध्यक्ष सौ. माया मुंढे, उपविभागीय अधिकारी प्रसाद मते, मुख्याधिकारी विजया घाडगे व तहसीलदार आकाश दहाडदे यांनी देखरेख केली. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या सतर्कतेमुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. निवडीच्या वेळी शेवगाव शहरासह पाथर्डी तालुक्यातील नागरिक तहसील कार्यालय परिसरात मोठ्या संख्येने उपस्थित होते. समित्यांची घोषणा झाली असली तरी समित्यांचे प्रत्यक्ष कामकाज कसे चालते, यावरूनच शहराच्या विकासाची दिशा ठरणार आहे. पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, आरोग्य तसेच महिला व बालकल्याण यासारख्या मूलभूत प्रश्नांवर राजकीय मतभेद बाजूला ठेवून निर्णय घेतले जातील का, याकडे आता शेवगावचे लक्ष लागले आहे.

### मराठा समाज सत्तेपासून वंचित

**शेवगाव नगरपरिषदेच्या विषय समिती रचनेत शहरातील संख्येने मोठा असणारा मराठा समाज महत्त्वाच्या समितीच्या सभापतीपदापासून वंचित राहिल्याची चर्चा आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व न मिळाल्याने समाजात नाराजी व्यक्त होत असून या निर्णयाचे पडसाद आगामी स्थानिक राजकारणावर उमटण्याची शक्यता वर्तवली जात आहे.**

# अनाथ मुलांसोबत वाढदिवस साजरा करण्याचा आनंद वेगळाच - शेलार



**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

अनाथ मुलांसोबत वाढदिवस साजरा केल्याचा आनंद शब्दात मांडता येणार नाही, अशी भावना श्रीगोंदा येथील ‘‘स्वाती वेलनेस’’च्या संचालिका शितल शेलार यांनी व्यक्त केली. श्रीगोंदा तालुक्यातील घुगलवडगाव येथील बाबा आमटे अनाथालय आश्रमात शितल शेलार यांनी लहान मुलांसोबत आपला वाढदिवस साजरा केला. यावेळी त्यांनी मुलांना खाऊ वाटप करून त्यांच्यासोबत वेळ घालवला. अनाथ मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद पाहून मन भारावून गेल्याचे त्यांनी सांगितले. समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपला वाढदिवस घरगुती स्वरूपात न साजरा करता अशा अनाथ आश्रमात साजरा करावा. यामुळे त्या मुलांच्या आयुष्यात आनंदाचे क्षण निर्माण होतील व त्यांचे दिवस आनंदात जातील, असे आवाहनही शेलार यांनी केले.

# आझाद हिंद सेनेचे सरसेनापती नेताजी सुभाषचंद्र बोस

स्वातंत्र्य चळवळीतील थोर क्रांतिकारक नेते आझाद हिंद सेनेचे सरसेनापती सुभाषचंद्र बोस यांची उद्या म्हणजे २३ जानेवारी रोजी जयंती आहे. २३ जानेवारी १८९७ रोजी कटक येथे नेताजींचा जन्म झाला. नेताजींना आठ भावंडे होती. ते लहानपणापासूनच बंडखोर प्रवृत्तीचे होते. वयाच्या १५ वर्षीच नेताजींनी हिमालयाच्या दिशेने प्रस्थान केले. पण त्यांना गुरू दर्शन झाले नाही म्हणून त्यांनी स्वामी विवेकानंद यांचे साहित्य वाचून त्यांना गुरू बनवले. कॉलेजमध्ये असताना एका इंग्रज शिक्षकाने भारतीयांना दूषणे दिली तेव्हा नेताजींनी उभे राहून त्या शिक्षकाला जाब विचारीत निषेध नोंदवला. इतकेच नाही तर त्या शिक्षकावर कारवाई व्हावी यासाठी कॉलेजमध्ये बंद पुकारला याचा राग मनात धरून कॉलेज प्रशासनाने त्यांना कॉलेजमधून काढून टाकले. १९२१ साली इंग्लंडला जाऊन नेताजींनी इंडियन सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा दिली त्यात ते चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. नेताजींनी काहीकाळ सिव्हिल सर्व्हीसमध्ये नोकरी देखील केली. पण भारत मातेला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी त्यांनी सिव्हिल सर्व्हिसच्या नोकरीवर पाणी सोडले. तेव्हा गांधीजींची असहकार चळवळ जोरात सुरू होती. असहकार चळवळ समजून घेण्यासाठी व स्वातंत्र्य चळवळीची पुढील दिशा ठरवण्यासाठी त्यांनी गांधीजींची भेट घेतली. महात्मा गांधींनी त्यांना चित्तरंजन दास यांच्याकडे पाठवले. चित्तरंजन दास हे त्यांचे राजकीय गुरू बनले. इंग्लंडची राणी कोलकात्याच्या दौऱ्यावर येणार आहे हे समजल्यावर नेताजींनी या दौऱ्यावर बहिष्कार टाकण्याची योजना आखली. इंग्रजांना त्याची कुणकुण लागताच त्यांनी नेताजी आणि चित्तरंजन दास यांना अटक केली. सहा महिने त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. तुरुंगात असताना त्यांनी इतिहास, धर्मशास्त्र आणि मानसशास्त्र या विषयांचे वाचन केले. तुरुंगातून मुक्त झाल्यावर त्यांनी भारतातील राजकीय परिस्थितीचा अभ्यास केला आणि ते राजकारणात सक्रिय झाले. ते बंगाल प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष बनले. पुढे त्यांनी इंडिया इंडिपेंडन्स युथ लीगची स्थापना करून तरुणांना संघटित केले. १९३० च्या सविनय कायदेभंगाच्या आंदोलनात नेताजींना पुन्हा अटक झाली. गांधी आयर्विन करारानंतर त्यांची मुक्तता झाली. ते कोलकात्याचे महापौर बनले. गांधी आयर्विन कराराला नेताजींनी विरोध केला त्यामुळे त्यांचे महात्मा गांधीशी मतभेद झाले. १९३२ साली सशस्त्र क्रांतिकारी संघटनेशी संबंध जोडून त्यांना अटक करण्यात आली. पण प्रकृतीच्या कारणावरून त्यांना तुरुंगात न ठेवता देशातून हद्दपार करण्यात आले. तीन वर्ष ते व्हिएन्ना येथे राहिले. तिथे त्यांनी युरोपातील राजकीय परिस्थितीचा अभ्यास केला. १९३७ साली गांधीजींच्या विरोधाला न जुमानता त्यांनी त्रिपुरा काँग्रेस अधिवेशनात अध्यक्षपदाची निवडणूक लढवली. अध्यक्षपदाच्या निवडणुकीत त्यांनी पट्टाभीसीतारामय्या यांचा पराभव केला. या निवडणुकीमुळे महात्मा गांधी नाराज झाले. हा आपलाच पराभव आहे असे ते मानू लागले. बहुसंख्य काँग्रेसजनांनी गांधीजींचेच नेतृत्व मान्य केले. त्यामुळे नेताजींनी अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन फॉरवर्ड ब्लॉक या पक्षाची स्थापना केली. नागपूर अधिवेशनात अस्थायी राष्ट्रीय सरकार स्थापन करण्याची मागणी करण्यात आली. पण संकल्पित सत्याग्रहापूर्वीच त्यांना अटक करण्यात आली. अटक केल्यानंतर नेताजींनी अन्नत्याग करु अशी धमकी दिली. या धमकीला घाबरून इंग्रजांनी त्यांना तुरुंगात न ठेवता त्यांच्या घरीच नजरकैदेत ठेवले. नजरकैदेत असतानाच त्यांनी वेषांतर करुन पेशावर गाठले तेथून ते जर्मनीला गेले. जर्मनीत त्यांनी भारतीयांना इंग्रजांविरुद्ध लढण्यास प्रवृत्त केले. त्यांनी तेथील भारतीयांना संघटित केले. जर्मनीमध्ये ते एडॉल्फ हिटलरला भेटले. बर्लिनमध्ये त्यांनी आझाद हिंद रेडिओ व फ्री इंडिया सेंटरची स्थापना केली. १९४३ ला नेताजींना जपानवरून आमंत्रण आले. जर्मनीहून जपान व्हाया मादागास्कर असा सबमरीन प्रवास करीत ते जपानला पोहचले. २१ ऑक्टोबर १९४३ रोजी त्यांनी सिंगापूर येथे आझाद हिंद सरकारची स्थापना केली. नेताजी स्वतः राष्ट्रप्रमुख, पंतप्रधान, संरक्षण मंत्री व सरसेनापती बनले. या राष्ट्राला जपान, जर्मनी, ब्रह्मदेश, इटली यासह ११ देशांनी मान्यता दिली. नेताजींनी तरुणांना आझाद हिंद सेनेत सहभागी होण्याचे आव्हान करीत तुम मुझे खून दो... मै तुम्हे आझादी दुंगा...अशी घोषणा केली. त्यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत हजारो तरुण आझाद हिंद सेनेत सामील झाले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात आझाद हिंद सेनेने जपानी लष्कराच्या साहाय्याने भारतावर आक्रमण केले. दोन्ही फौजांनी इंग्रजांकडून अंदमान निकोबार बेटे जिंकली. ब्रह्मदेशमधून आझाद हिंद सेनेच्या फौजा भारताकडे निघाल्या मात्र नैसर्गिक आपत्तीमुळे आझाद हिंद सेनेला माघार घ्यावी लागली. रंगून आकाशवाणी वरुन नेताजींनी भाषण करुन इंग्रजांशी कोणत्याही प्रकारचा समजोता न करण्याचे, फाळणी न करण्याचे लढा चालूच ठेवण्याचे आव्हान केले. महायुद्धात जर्मनी, इटली यांचा पराभव झाला. जपानने शरणागती पत्करली तेव्हा नेताजींनी रशियाला जाण्याचा निर्णय घेतला. १८ ऑगस्ट १९४५ रोजी नेताजी विमानातून माणचुरीयाच्या दिशेने जात होते. प्रवासादरम्यान त्यांचे विमान बेपत्ता झाले. २३ ऑगस्ट १९४५ रोजी जपानच्या दोनयी वृत्तसंस्थेने जगाला कळवले की १८ ऑगस्ट रोजी नेताजींच्या विमानाला अपघात झाला त्यात नेताजींचे निधन झाले. १९९२ साली भारत सरकारने नेताजींना मरणोत्तर भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार देण्याची घोषणा केली पण मृत्यूबाबत कोणताही पुरावा उपलब्ध नसल्याने त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देणे अवैध आहे असे म्हणत त्यांच्या कुटुंबीयांनी हा पुरस्कार नाकारला. तुम मुझे खून दो... मै तुम्हे आझादी दुंगा... असा नारा देत भारतीयांमध्ये स्वातंत्र्य लढ्याची चेतना निर्माण करणाऱ्या नेताजींना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

# शेतकऱ्यांना ई-पिक पाहणी नोंदणीचे आवाहन

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

महाराष्ट्र शासनाच्या महत्वाकांक्षी ई-पिक पाहणी (DCS) योजनेअंतर्गत रब्बी हंगाम २०२५-२६ साठी पिकांची नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असून, शेवगाव तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी आपल्या पिकांची नोंदणी वेळेत करावी, असे आवाहन तहसीलदार आकाश दहाडदे यांनी तहसील कार्यालय, शेवगाव यांच्या वतीने केले. ई-पिक पाहणीची सुरुवात १० डिसेंबर २०२५ पासून झाली असून शेतकरी स्तरावर पिकांची नोंदणी करण्याची अंतिम मुदत २४ जानेवारी २०२६ निश्चित करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी स्वतःच्या अँड्रॉईड मोबाईलद्वारे ''ई-पिक पाहणी'' ॲपचा वापर करून ७/१२ वरील पिकांची नोंदणी करणे आवश्यक आहे. सदर नोंदणी ४.०.५ या आवृत्तीच्या मोबाईल ॲप्द्वारे करावी लागणार असून ॲप गुगल प्ले स्टोअरवरून अपडेट करून इन्स्टॉल करणे बंधनकारक आहे. नोंदणी करताना शेतात जाऊन प्रत्यक्ष पिकाची माहिती व फोटो अपलोड करणे आवश्यक आहे. ज्या शेतकऱ्यांकडे अँड्रॉईड मोबाईल उपलब्ध नाही किंवा ॲप वापरण्यात अडचण येत आहे, त्यांनी संबंधित गावचे तलाठी, कोतवाल, ग्रामसेवक, कॉमन सर्व्हिस सेंटर (CSC) किंवा डीसीएस सहाय्यकांची मदत घ्यावी, असेही तहसील प्रशासनाने स्पष्ट केले आहे. ई-पिक पाहणीद्वारे पिकांची नोंदणी न झाल्यास संबंधित ७/१२ वर पीक कोरा राहील. परिणामी शेतकऱ्यांना पीक विमा, शासकीय अनुदान, नुकसान भरपाई तसेच नैसर्गिक आपत्ती मदत मिळण्यात अडचणी येऊ शकतात. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी मुदतीपूर्वी नोंदणी पूर्ण करणे आवश्यक असल्याचे तहसील प्रशासनाने कळविले आहे.



# क्रेडाई बेळगाव बेल्कॉन व यश इव्हेंटस ऑटो एक्सपो प्रदर्शन

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

क्रेडाई बेळगाव व यश इव्हेंटस यांच्यावतीने बेल्कॉन २०२६ बांधकाम, प्रॉपर्टी, बांधकाम साहित्य, इंटिरियर्स, एक्स्टेरियर, फर्निचर तसेच ऑटो एक्सपो प्रदर्शनाचे आयोजन ता. ५ ते ८ फेब्रुवारी दरम्यान करण्यात आले आहे. या प्रदर्शनाची मुहूर्तमेढ काल (बुधवारी) सकाळी सीपीएड मैदानावर रोवण्यात आली. यावेळी प्रथमच हे प्रदर्शन अत्यंत आधुनिक व सुसज्जित वातानुकूलित शामियान्यात संपन्न होणार आहे. कर्नाटक राज्यात बेंगळुरूनंतर बेळगावात अशा प्रकारचे भव्य रिॲलिटी, इंटिरियर्स आणि बांधकाम साहित्य प्रदर्शन आयोजित करण्यात येत आहे. ग्राहकांना एकाच छताखाली स्वप्नातील घरासाठी आवश्यक असलेल्या विविध प्रकारच्या बांधकाम साहित्याची माहिती मिळणार आहे. तब्बल एक लाख स्क्वेअर फूट जागेत बेल्कॉन व ऑटो एक्सपो प्रदर्शन संपन्न होणार आहे. बेल्कॉनच्या १५० स्टॉल्समध्ये फ्लॅट, बंगला, विटा, वाळू, स्टील, प्लायवूड, लाइटिंग, गृहसजावट, लिफ्ट यांसह बांधकाम क्षेत्रातील विविध साहित्य व सुविधांचे प्रदर्शन आणि माहिती ग्राहकांना मिळणार आहे. ऑटो एक्सपोमध्ये शंभर स्टॉल्सवर विविध नामवंत कंपन्यांच्या कार, टू-व्हीलर, ई-व्हेईकल्स, वाहनांचे स्पेअर पार्ट, विंटेज कार, स्टंट ड्रायव्हिंग आदींचे प्रदर्शन पाहायला मिळणार आहे. मुहूर्तमेढ कार्यक्रमास क्रेडाईचे अध्यक्ष युवराज हुलजी, महेश फगरे, ज्ञानेश्वर सायनेकर, सचिन बैलवाड, इव्हेंटचे संचालक प्रकाश कालकुंद्रीकर, अजिंक्य कालकुंद्रीकर, विनय कदम, सचिन कल्लीमनी, तनिश कल्लीमनी, राजेंद्र मुतगेकर, अभिषेक मुतगेकर, क्रेडाई इव्हेंट चेअरमन प्रशांत वाडकर, दीपा वाडकर, अमर अकनोजी, सीमा हुलजी, सुधीर गड्डे, राजेश माळी, नारायण पवार, वीरेश शटनवर, यश कल्लीमनी, गोविंद टक्केकर, आनंद कुलकर्णी, पी.एस. हिरेमठ आदींसह अनेक सदस्य उपस्थित होते.

# उखलगाव येथील शाळा, अंगणवाड्या सौरऊर्जेवर कार्यान्वित

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

उखलगाव गावाने शैक्षणिक व पर्यावरणपूरक विकासाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून गावातील सर्व शाळा व अंगणवाड्या आता १०० टक्के सौरऊर्जेवर कार्यान्वित झाल्या आहेत. या उपक्रमामुळे वीजपुरवठ्यातील अडथळे दूर होऊन विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला सातत्य मिळणार आहे. Burckhardt Compression India Pvt. Ltd.या कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व (CSR) उपक्रमांतर्गत चिराग फाउंडेशन यांच्या माध्यमातून श्री खंडेश्वर माध्यमिक विद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तसेच उखलगाव व वाळके मळा येथील अंगणवाड्यांमध्ये सौरऊर्जा प्रणाली यशस्वीपणे बसविण्यात आली आहे. या सर्व संस्था आता पूर्णतः सौरऊर्जे वर सुरू असून पर्यावरण संरक्षण व शाश्वत विकासाला चालना मिळाली आहे. या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी गणेश लक्ष्मण लाकुडझोडे यांनी विशेष परिश्रम घेतले. शाळा व्यवस्थापन समिती, सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्यांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले असून ग्रामस्थांनीही या उपक्रमाचे स्वागत केले आहे. या उपक्रमाला पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी राणी फराटे तसेच विस्तार अधिकारी यादव यांनी भेट देऊन कौतुक केले. त्यांनी उखलगाव ग्रामपंचायतीच्या नियोजनबद्ध, पारदर्शक व लोकसहभागातून राबविलेल्या कामगिरीचे विशेष कौतुक केले. सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामविकास अधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थ यांच्या एकजुटीमुळे उखलगाव ग्रामपंचायत मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज योजना स्पर्धेत आदर्श व सक्षम ग्रामपंचायत म्हणून पुढे येत असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.



# माजी विद्यार्थी मेळाव्यात जुन्या आठवणींना उजाळा

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

नगरपालिका शाळा क्रमांक ३ मध्ये माजी विद्यार्थी मेळावा मोठ्या उत्साहात व कौटुंबिक वातावरणात साजरा करण्यात आला. अनेक वर्षांनंतर शाळेच्या आवारात एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी आपल्या बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. शाळेच्या मुख्याध्यापिका स्मिता गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. शाळेबद्दलची आपुलकी, सामाजिक जबाबदारीची जाणीव व संघभावना जोपासण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. या स्नेहमेळाव्याचे औचित्य साधून माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांचा यथोचित सत्कार केला. कृतज्ञता व्यक्त करत माजी विद्यार्थ्यांनी शाळेला उपयुक्त भेटवस्तूही दिली. यावेळी दशरथ शिंदे, नितीन वाघडकर, अंकुश करंडे व किशोर काळे या माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करत शालेय जीवनातील प्रसंग सांगितले.

शाळेतील शिक्षकांनी माजी विद्यार्थ्यांना शाळेच्या भौतिक सुविधांच्या विकासासाठी शक्य ते सहकार्य करण्याचे आवाहन केले. या आवाहनाला विद्यार्थ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. या मेळाव्यास बाळासाहेब शेळके, दिगंबर तुपे, बाळासाहेब बनसोडे, विनोद बोदडे, ज्ञानेश्वर वाघडकर, संतोष त्रिभुवन, सोन्याबापू शेळके, नितीन करंडे, गौतम शिंदे, गंगाराम देवकर, तुषार बारसे, गणेश पाचारे यांसह अनेक माजी विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका स्मिता गायकवाड, राजेंद्र गायकवाड, प्राची लोळगे, सचिन डोखे, पल्लवी बोरुडे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र गायकवाड यांनी केले, तर आभार प्राची लोळगे यांनी मानले.



# नव्या, जुन्या दिग्दर्शकांनी उलगडल्या चित्रपट निर्मितीच्या कथा

**पुणे । रयत समाचार**

पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (पिफ) आज मराठी चित्रपट स्पर्धेतील 'आदिशेष' (रमेश मोरे), 'तो, ती आणि फुजी' (मोहित टाकळकर), 'तिघी' (जिजीविषा काळे), 'जीव' (रवींद्र माणिक जाधव), 'गोंधळ' (संतोष डावखर), 'गमन' (मनोज नाईक साटम) आणि 'बाप्या' (समीर तिवारी) या चित्रपटांच्या दिग्दर्शकांशी 'पिफ'चे उपसंचालक विशाल शिंदे यांनी संवाद साधला. यावेळी नव्या आणि अनुभवी दिग्दर्शकांनी चित्रपट निर्मितीतील अनुभव कथन करत आपापल्या प्रवासातील संघर्ष आणि प्रेरणा उलगडली.

'तिघी'च्या दिग्दर्शिका जिजीविषा काळे म्हणाल्या, ''माझा प्रवास 'वजनदार' चित्रपटात सहाय्यक म्हणून सुरू झाला. १२ वर्षांनंतर माझा दिग्दर्शक म्हणून चित्रपट येतोय. पॅशन कितीही जोरदार असली तरी योग्य माणसे बरोबर नसतील तर गोष्ट पुढे जात नाही. मला सतत चांगली माणसे मिळाली. मी एकुलती एक मुल असल्याने सतत एकटे वाटत आले आणि तीच गोष्ट मी चित्रपटातून मांडली आहे. मी आयुष्यात पाहिलेल्या बायका माझ्या चित्रपटात दिसतील.'' 'तो, ती आणि फुजी'चे दिग्दर्शक मोहित टाकळकर म्हणाले, ''मी नाटक करत होतो, पण चित्रपट तयार करण्याचा विचार मनात सतत होता. त्यातून पुढे चित्रपट करण्याचा निर्णय घेतला. मी शहरात वाढलो. गोष्टी मिळालेल्या असल्या तरी शहरी कोलाहलात अनेक प्रश्न भेडसावत आहेत.

नात्यांमधले बदल हेच विषय मी चित्रपटात मांडले आहेत.'' 'जीव'चे दिग्दर्शक रवींद्र माणिक जाधव म्हणाले, ''धुळ्यात शिक्षक म्हणून काम करत असतानाही चित्रपट करण्याचा विचार होता. २०१३ ला पहिला माहितीपट तयार केला. 'शाळाबाह्य', 'निरोध' असे माहितीपट हँडीकॅमवर केले. चित्रपट कसा करायचा काहीच माहित नव्हते. 'थाळ भांकसर' माहितीपटाला दोन लाखांचे बक्षीस मिळाले आणि पुढे कामाची प्रेरणा मिळाली. २०१८ मध्ये एका आठवणीवरून 'जीव'ची कथा पुढे आली. बायको आर्थिकदृष्ट्या मागे उभी राहिली आणि चित्रपट पूर्ण झाला.'' 'गमन'चे दिग्दर्शक मनोज नाईक साटम म्हणाले, ''मी फोटोग्राफर होतो. लग्नाचे फोटो काढायचो. व्हिडिओ शुटिंग पाहत पुढे आलो. लहानपणापासून अनेक चित्रपटदृश्य मनात ठसली होती. एक कथा लिहिली, ती कादंबरी झाली. २०१५ मध्ये ती प्रसिद्ध झाली.

पैसे नव्हते, हातात होते ते सगळे पणाला लावले. वेडे होणे किंवा डुबणे हेच पर्याय होते. मी डुबायचे ठरवले. कोकणातूनच पात्रं पुढे आली आणि चित्रपट पूर्ण झाला.'' 'बाप्या'चे दिग्दर्शक समीर तिवारी म्हणाले, ''मी उत्तर प्रदेशमधील आहे. मात्र बायको मराठी आहे आणि मला मराठीमधूनच चित्रपट करायचा होता. निर्माता मिळवण्यात चार वर्षे गेली. शेवटी बायकोने पैसे उभे केले. गिरीश कुलकर्णी यांनी मदत केली आणि माझ्या मनातील कथा पुढे आली.'' 'आदिशेष'चे दिग्दर्शक रमेश मोरे म्हणाले, ''मी मुंबईच्या झोपडपट्टीत वाढलो. चित्रपट निर्मितीचे तंत्र शिकलो नाही, करतच शिकत गेलो. साहित्याचा विद्यार्थी आहे. शिक्षकाने आत्मविश्वास दिला. साडेतीन वर्षे निर्माते शोधत होतो. कोविडमध्ये जे अनुभवले, त्यातून 'शेष' पुढे आला. आ. ह. साळुंके यांचे 'बळीवंश' वाचले आणि पात्रं पुढे आली. कोकणातूनच कलाकार येत गेले आणि चित्रपट तयार झाला.'' 'गोंधळ'चे दिग्दर्शक संतोष डावखर म्हणाले, ''चित्रपट निर्मितीची पार्श्वभूमी नाही. १० वी पहिला चित्रपट पाहिला होता. २०१३ मध्ये पहिली शॉर्टफिल्म केली. ओटीटी मराठी चित्रपट नाकारत होते. रॉबर्ट मकी यांचे पटकथेवरील पुस्तक वाचून अनेक चित्रपट पाहिले. विषय 'गोंधळ' असल्याने गोंधळी मंडळी बोलावून गाणी ऐकली. बँकेकडून कर्ज काढून चित्रपट तयार केला.

